पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/१४००/२०१२
दिनांक :- ०१/११/२०१२

प्रति,

मा. ........................................
सदस्य, क्रिडा समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची सभा दिनांक ०७ / ११ / २०१२ रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०७ / ११ / २०१२ रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकिय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत :- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८.
मा. क्रिडा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - १२**

दिनांक :- ०७ / ११ / २०१२ वेळ :- दुपारी ४ : ०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०७ / ११ / २०१२ रोजी दुपारी ४:०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकिय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

**दिनांक १७/१०/२०१२ व २२/१०/२०१२ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक ११) सभावृत्तांत कायम करणे.**

---------

विषय क्र. १) पिंपरी चिंचवड मनपाच्यावतीने, युनायटेड फ्रेंडस् स्पोर्ट्स ॲकॅडमी, संत तुकारामनगर, पिंपरी ४११ ०१८ यांचे सहकार्याने व पुणे जिल्हा सॉफ्टबॉल असो. यांचे मान्यतेने दि. २१ ते २४ नोव्हेंबर २०१२ या काळात महापौर चषक राज्यस्तर सॉफ्टबॉल स्पर्धा २०१२ आयोजित करणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे येणा-या र.रु.८,९५,७५०/- चे खर्चास मान्यता देणेकामी व सदर खर्चातील मैदान तयार करणे, स्टेज, मंडप, टेबल-खुर्च्या व्यवस्था खर्च, मैदानावर पाणी फवारणी खर्च हा स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत, स्पिकर, माईक व्यवस्था हा खर्च विद्युत विभाग संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व क्रिडा साहित्य खरेदी, नेट लावणे मजूरी व खेळाडू - पंच निवास व्यवस्था खर्च युनायटेड फ्रेंडस् स्पोर्ट्स ॲकॅडमी, संत तुकारामनगर, पिंपरी ४११ ०१८ यांचेकडून खर्च करणेस मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड मनपाच्यावतीने व पिंपरी चिंचवड महानगर चेस असो., चिंचवड, पुणे ३३ यांचे सहकार्याने दि. ०७ ते ०९।१२।२०१२ या काळात महापौर चषक खुली बुध्दीबळ स्पर्धा २०१२ आयोजित करणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे येणा-या अंदाजे र.रु.२,९७,६००/- चे खर्चास मान्यता देणेकामी व यापैकी स्टेज, मंडप, खुर्च्या व्यवस्था खर्च, हॉल व्यवस्था, टेबल १००, खुर्च्या ४०० खर्च हा स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत स्पिकर, माईक व्यवस्था खर्च हा विद्युत विभाग संबंधित प्रभाग यांचेकडून खर्च करणेस मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस / ४ / कावि / १४०० / २०१२
दिनांक :- १ / ११ / २०१२

**टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.**